## प्रकरण दुसरे

# 'मुखवटा' कादंबरीचा परिचय

## प्रकरण दुसरे

# 'मुखवटा' कादंबरीचा परिचय


०१. प्रास्ताविक :

०२. प्रा. टी. के. जाधव व्यक्ती आणि वाङ्मय :

०३. मुखवटा कादंबरीचा परिचय :

३.१ कादंबरीचा आशय :

३.२ कादंबरीचे कथानक :

३.३ व्यक्तिचित्रणे :

३.४ निवेदनपद्धती :

३.५ भाषाशैली :

* काव्यात्मकता :
* उपमा आणि प्रतिमा :
* हिंदी - इंग्रजी शब्दांचा वापर :
* शिव्या आणि अश्लीलता :
* म्हणी - वाक्प्रचार :

३.६. कादंबरीतील वर्णने :

३.७. भाष्य :

०४. समारोप :

* संदर्भ ग्रंथ :

# प्रकरण दुसरे

# 'मुखवटा' कादंबरीचा परिचय

## ०१. प्रास्ताविक :-

लेखक ज्या वातावरणात,समाजात, काळात वावरला, लहानाचा मोठा झाला,त्या वातावरणाचा, समाजाचा, काळाचा व सभोतालच्या परिस्थितीचा, परिसराचा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर व पर्यायाने त्याच्या साहित्यावर त्याचा परिणाम होत असतो. कोणत्याही साहित्यकृतीचे वाचन करीत असताना, जर त्या कलाकृतीच्या लेखकाचे जीवन-चरित्र माहित असेल तर त्या कलाकृतीचे आकलन होण्यास त्याची मदत होते. म्हणूनच येथे 'मुखवटा'कादंबरीचा परिचय करून घेण्याअगोदर प्रा.टी.के.जाधव यांचा परिचय थोडक्यात करून घेणे योग्य ठरेल.

## ०२. प्रा.टी.के.जाधव-व्यक्ती आणि वाङ्मय :-

प्रा. तुळशीदास कोंडाजी उर्फ टी. के. जाधव यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील 'मनमाड' या गावी २७ नोव्हेंबर १९५१ रोजी शांताबाईंच्या पोटी कैकाडी समाजात झाला. कोंडाजी भागोजी जाधव उर्फ 'काका' हे त्यांचे वडील. तर श्रीसंत कैकाडी महाराज हे त्यांचे चुलते. श्री. रामदास महाराज व श्री. वाल्मिकी महाराज हे त्यांचे थोरले बंधू. याशिवाय त्यांना आणखी एक भाऊ व दोन बहिणी होत्या पण ते बालपणीच आजाराने वारले.

प्रा. जाधव यांचे पिता काका हे आपल्या वडीलांचाच ठेकेदारीचा व्यवसाय करत होते. ते कैकाडी समाजात जन्मले असले तरी त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती उत्तम प्रकारची होती. घरी भरपूर शेती होती. धन-धान्याला, पैशाला कसलीही कमतरता नव्हती. काकांनीही ठेकेदारीतून अमाप पैसा जमवला.

काकांचे शिक्षण काहीही झाले नव्हते. जरी ते अडाणी असले तरी त्यांना शिक्षणाबद्दल आदर होता, प्रेम होते. शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात ओढ होती. आपल्या मुलांनी शाळेत जावे, चांगले शिक्षण घ्यावे, खुप-खुप शिकावे असे त्यांना मनोमन वाटायचे. पण घरात चालणारी ईश्वरभक्ती पाहून त्यांच्या थोरल्या दोन मुलांचा ओढा शाळेपेक्षा आध्यात्मिकतेकडेच अधिक

होता. त्या दोघांनाही शिक्षणात रस नव्हता, ते ईश्वर भक्तीतच रममाण होते.

मात्र प्रा. जाधव यांच्या मनात काकांप्रमाणेच शिक्षणाबद्दल आदर, प्रेम होते. त्यांचा शिक्षणाकडचा कल पाहून,त्यांच्या मनातील शाळेबद्दलची आपुलकी, ओढ पाहून काकांना त्यांचे कौतुक वाटायचे.त्यामुळे काकांना प्रा. जाधव यांच्याबद्दल थोडा अधिक आदर वाटू लागला. ते त्यांच्याकडे अधिक लक्ष देवू लागले. ते त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देवू लागले. त्यांना प्रोत्साहित करू लागले. त्यांच्याशी अनेक विषयांवर मनमोकळेपणाने चर्चा करु लागले. प्रा. जाधव यांच्या शिक्षणातून काका आपली शिक्षणाची तहान भागवू लागले. आपली शिक्षणाची आवड ते अशा प्रकारे पूर्ण करू लागले.

अशा या सधन व आध्यात्मिक वारसा लाभलेल्या कुटुंबात प्रा. टी. के. जाधव यांचे बालपण अगदी सुखात व्यतित झाले. त्यांचे सगळे बालपण त्यांच्या जन्मस्थानीच गेले.त्यांचे पहिली ते अकरावी पर्यंतचे शिक्षण 'जी. आय. पी. इंडियन हायस्कूल, मनमाड,' येथे झाले. यानंतर ते १९७० मध्ये 'जी. डी. आर्ट पेंटिंग'चा डिप्लोमा करण्यासाठी नाशिकला गेले. पण पूर्वीपासून अवघड वाटणारा गणितासारखा परस्पेटीव्ह हा विषय येथेही असल्याने त्यांनी हा डिप्लोमा मधूनच सोडून दिला व ते १९७२ मध्ये पंढरपूरला आले.

दरम्यान पंढरपूर येथे 'सहस्त्र कोटी नाम जप झोपडी' चे (श्रीसंत कैकाडी महाराज मठाचे) बांधकाम काकांनी सुरू केले होते. त्याच्या देखभालीसाठी काका आपला सर्व परिवार घेऊन पंढरपूरला आले होते. म्हणूनच प्रा. जाधव हेही नाशिक सोडून पंढरपूरला येवून दाखल झाले.

पंढरपूरला आल्यानंतर तेथिल 'कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर,' या महाविद्यालयात पी. डी. आर्टला प्रवेश घेऊन आपले खंडित झालेले शिक्षण पुन्हा सुरू केले. १९७५ मध्ये त्यांनी हिंदी विषयातून बी. ए. ची पदवी मिळविली. यानंतर 'दयानंद कला व शास्त्र महा- विद्यालय, सोलापूर' येथून एम. ए. ची पदवी हिंदी विषयातूनच संपादन केली. त्यांचे बी. एड. 'वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर' या महाविद्यालयात झाले. तेथेच त्यांनी जवळपास दोन वर्ष प्राध्यापक म्हणून नोकरी केली. काही कारणास्तव त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला व पुन्हा एकदा ते पंढरपूरला आले.

याच काळात 'सहस्त्र कोटी नाम जप झोपडी'चे बांधकाम पूर्ण झाले होते. तिची कवाडे

भक्तजणांसाठी खुली करण्यात आली होती. त्याची व्यवस्था पाहण्यासाठी प्रा. जाधव तेथेच राहू लागले. ते आजही तेथे येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांची सेवा करीत, मठाची देखभाल करून, आपले साहित्यिक लेखन-वाचन करत या 'सहस्त्रकोटी नाम जप झोपडीत' च वास्तव्य करुन आहेत.

प्रा. टी. के. जाधव यांना काव्य वाचनाची, गजल वाचनाची फार आवड आहे. उर्दु कवी साहिर लुधियान्वी, शकील बदायुनी, फिराख गोरखपुरी, मिर्झा गालिब हे गजलकार त्यांना विशेष प्रिय आहेत. संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांना तर ते आराध्य दैवत मानतात. तसेच ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, प्रेमचंद, सुरेश भट्ट या साहित्यिकांबद्दल त्यांच्या मनात आदर आहे.

उर्दु गजल, शायरी वाचनाची व ऐकण्याची त्यांना दहावीत असतानाच आवड निर्माण झाली. 'दिवाने गालिब' हा मिर्झा गालिब यांचा प्रा. जाधव यांच्या वाचनात आलेला पहिला काव्यसंग्रह होय. येथून पुढे त्यांना गजल वाचण्याचा व गजल रचण्याचा छंदच जडला. त्यांना वाचानाची फार आवड आहे. त्यांना वाचनातूनच साहित्य लेखनाची प्रेरणा मिळाली.

घरात कैकाडी महाराज व वडील काकांच्या रुपाने आराधना चालू होती. मठ पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकभक्तांचा सहवास, ज्ञानेश्वरी, गीतेचे वाचन, मठात चालणारे कीर्तन, वडीलांशी व चुलत्यांशी होणारी अध्यात्मिक चर्चा, विठ्ठलाचा सहवास या सर्व कारणांमुळे त्यांच्या मनावर अध्यात्मिक संस्कार झाले. त्याचा परिणाम त्यांच्या साहित्यनिर्मितीवर झाला. त्यांच्या साहित्यात या सर्व कारणांमुळेच विविधता आढळते. त्यांचे साहित्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**• प्रा. टी. के. जाधव यांची साहित्यसंपदा :**

प्रा. टी. के. जाधव हे आध्यात्मिक कुटुंबात, वातावरणात वाढलेले आहे. त्यांनी साहित्याच्या विविध क्षेत्रात आपली लेखणी आजमावली आहे. त्यांच्या साहित्याचा परिचय करुन घेताना ते 'पद्य साहित्य' व 'गद्य साहित्य' अशा दोन विभागात विभागून त्यांचा थोडक्यात परामर्शन घेता येईल.

*** पद्यसाहित्य :-**

**१) भावतरंग :**

'हा काव्यसंग्रह १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला. या काव्यसंग्रहाची सुरुवात व शेवट ही 'शारदास्तवना' ने झाली आहे. त्यात एकूण ४२ कविता आहेत. त्यातील काही कवितांमधून विठ्ठल दर्शनाचा ध्यास, त्यातून निर्माण झालेली व्याकुळता, विठ्ठलाच्या दर्शनाचा आनंद प्रकटताना दिसतो. शिवाय विषमतेची चीड, मार्क्सवाद, प्रेयसीचा विरह, जीवनातील अपूर्णता इत्यादी विषयही काही कवितांतून आले आहेत. 'संगीता' या काव्यातून शोक प्रकट झाला आहे.

अशा प्रकारे 'भावतरंग' या काव्यसंग्रहातून विषयाची विविधता कवीच्या मनाची उत्कटता व कल्पनाचमत्कृतीचे दर्शन होते.

**२) अमृत-कण :**

हा भक्तीकाव्यसंग्रह असून तो १९७९ मध्ये प्रकाशित झाला. हे चंपूकाव्य आहे. यात भक्तांच्या अध्यात्मिक मनोअवस्थेची कहाणी असल्याचे दिसून येते. भक्ताच्या विविध मनोवस्थांचे भावरुप चित्रणही आलेले दिसते. '' 'अमृत-कण' संगीताच्या पावलांनी मराठी घरा-घरात जायला हवेत. ते रसिकाला काव्यानंद देतील आणि भक्तहृदयाला अध्यात्मविद्येचे पथप्रदर्शन करतील. 'अति हळूवारपणे आणेलिया चित्ता' वेचावेत असेच ते आहेत.''[१] असा अभिप्राय 'अमृत-कण' च्या प्रस्तावनेत र. बा. मंचरकर देतात.

या काव्यसंग्रहाचे कुलकर्णी डी. एन. यांनी 'Drops of Nector' या नावाने इंग्रजीत रुपांतर केले आहे. तसेच 'अमृत-कण' या काव्यसंग्रहास १९८३ मध्ये 'नरहर कुरुंदकर पुरस्कार' मिळाला आहे.

**३) ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय :**

'प्रा. टी. के. जाधव यांनी 'ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्याया'चे हिंदी भाषेत रुपांतर करुन, तो अध्याय 'ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय' या नावाने १९८१ मध्ये प्रसिद्ध केला. हा अनुवाद पद्यमय आहे. या अनुवादास शिक्षण आणि संस्कृती संचलनालय, दिल्ली तर्फे १९८३ मध्ये 'अहिंदी भाषिक प्रदेशातील हिंदी भाषिकांसाठी' असणारा केंद्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

### ४) यह तुम क्या कर रहे हो? :

हे चंपूकाव्य श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांची हत्या करणाऱ्या बेअंतसिंहला अंत्यसमयी जो प्रश्न विचारला, 'यह तुम क्या कर रहे हो?' त्यावर आधारित आहे. इंदिरा गांधीच्या हत्येनंतर मुंबई येथे जी पहिली शोकसभा आयोजित करण्यात आली होती, त्या शोकसभेत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या हस्ते हे चंपूकाव्य प्रकाशित करण्यात आले.

श्रीमती इंदिरा गांधींचा आत्मा देशात सर्वत्र भटकत आहे व देशातील दंगल, लुटमार, जातीयवाद, अन्याय, अत्याचार, चोरी, बेकारी, भ्रष्टाचार पाहून सगळ्यांना एकच प्रश्न विचारतो, 'यह तुम क्या कर रहे हो?' अशी कल्पना करुन हे चंपूकाव्य रचले आहे. यातून कवीने देशातील अनेक समस्यांवर प्रकाश टाकला आहे. या चंपूकाव्याची राजीव गांधी यांनी पत्राद्वारे स्तुती केली आहे.

### ५) गुलशन-ए-गजल :

'गुलशन-ए-गजल' हा एकूण ४० उर्दु गजलांचा संग्रह आहे. हा स्वरचित असून देवनागरी लिपित आहे. तो १९८५ मध्ये प्रकाशित झाला. या गजल संग्रहातील गजलांचा मुक्त मराठी भावार्थही देण्यात आला आहे. या गजलांमधून विरह भावना आविष्कृत होताना दिसते.

'गुलशन-ए-गजल' विषयी रब्बेसलाम शेख लिहितात, ''प्रेम हीच भक्ती आहे. मंदिर-मशिदीमध्ये देव नसून प्रीतीच्या तेजाचा दीप उजळण्याचे नावच 'धर्म' होय. या कवीच्या तत्त्वज्ञानाचा अविष्कार या गजलांमध्ये झाला आहे.''[२] प्रियेवरील प्रेमभावनेच्या विविध रंगांनी ही गजल बहरलेली आहे.

### ६) भक्तियोग :

'भक्तियोग' हा ज्ञानेश्वरीमधील बाराव्या अध्यायाचा हिंदी अनुवाद आहे. हा अनुवाद १९९० मध्ये प्रकाशित झाला. या भाषांतराचेही स्वरुप पद्यात्मकच आहे. बाराव्या अध्यायातील भक्तीचे तत्त्वज्ञान हिंदीमधून इथे सांगण्यात आले आहे.

### ७) भक्तिगीते :

प्रा. जाधव यांनी कविता, गजल, कादंबरी, कथा इत्यादी लेखनाबरोबरच भक्तिगीतेही

लिहिली आहेत. त्यांच्या भक्तिगीतांची संख्या विपुल प्रमाणात आहे. आजपर्यंत त्यांच्या जवळ-जवळ ७० ते ७५ भक्तिगीतांच्या कॅसेटस् प्रकाशित झाल्या आहेत. पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूर, आळंदी, अक्कलकोट अशा अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी गीते लिहिली आहेत. तसेच 'श्री विठ्ठल', 'स्वामी समर्थ', 'गजानन महाराज', 'साईबाबा', 'श्री गणेशोत्सव' अशा सर्वच धार्मिक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे.

'परब्रह्म सावळे' (१९८१) हे त्यांचे पहिले भक्तिगीताचे कॅसेट. अजित कडकडे हे त्याचे गायक आहेत. तसेच 'विठू माझी माऊली', 'विठ्ठल महिमा', 'श्री विठ्ठल', 'श्री स्वामी समर्थ', 'अवघी दुमदुमली पंढरी' ही काही त्यांच्या गाजलेल्या कॅसेटची नावे होत. भक्तिगीतांच्या बरोबरीनेच त्यांनी गौळणीही लिहिल्या आहेत. 'गोकुळचा चोर', 'आला आला कान्हा', 'राधेचा कन्हैया' ह्या त्यांच्या काही गौळणीच्या कॅसेटस्.

''जुन्या हिंदी चित्रपटांच्या नृत्यगीतांच्या चालीवर आधारित लिखाण केल ते यशस्वी ठरलं. सुरुवातीचा प्रयोग मीच केला.'' तसेच ''पंढरीच्या श्री विठ्ठलाची कॅसेट मीच पहिल्यांदा हिंदी भाषेत प्रकाशित केली.''[३] असा ते आपल्या नव्या प्रयोगाचा उल्लेख एका मुलाखतीत करतात. त्यांचा हा नवा प्रयोग मोठ्या प्रमाणावर यशस्वी होतांना आज दिसतो. त्यांच्या भक्तिगीतांना सुरेश वाडकर, अजित कडकडे, महेंद्र कपूर, प्रल्हाद शिंदे, उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल, वैशाली सामंत असे अनेक सुप्रसिद्ध गायक लाभले. त्यांच्या कॅसेटस्‌ही नामवंत कंपन्यांनीच प्रकाशित केल्या.

अशा प्रकारचे प्रा. टी. के. जाधव यांच्या पद्य वाङ्मयाचे स्वरुप आहे. त्यात गजल, कविता, चंपूकाव्य, अनुवादीत साहित्य, गौळणी, भक्तिगीते अशी विविधता आहे. त्यांनतर त्यांच्या गद्य साहित्याचे स्वरुप पहावयाचे आहे.

**• गद्य साहित्य :-**

पद्य साहित्याच्या तुलनेने प्रा. टी. के. जाधव यांचे गद्य साहित्य मात्र फारच कमी आहे. ते पुढीलप्रमाणे -

**१) मुखवटा :**

'मुखवटा' ही कादंबरी १९८१ च्या डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध झाली. या कादंबरीस

१९८५ मध्ये 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदे' चा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही कादंबरी नलिनी या अविवाहित तरुणीवर आधारित आहे. महान समाजसेविका, प्राध्यापिका अशी प्रतिमा असणाऱ्या स्त्रीचे खरे रुप दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने 'मुखवटा' या कादंबरीत केला आहे. कादंबरीतील घटनांचा, प्रसंगांचा, भाषाशैलीचा, पात्रांचा सविस्तर अभ्यास पुढे करण्यात येणार आहे.

**२) नागमणी :**

प्रा. टी. के. जाधव यांची 'नागमणी' ही दुसरी कादंबरी आहे. मात्र ती भाषांतरीत आहे. ही कादंबरी अमृता प्रीतम यांच्या 'नागमणी' या हिंदी कादंबरीचा मराठी अनुवाद आहे.

या कादंबरीच्या नायकाला पैसे देऊन मिळणारे शरीर सुख मान्य आहे. पण प्रेम मान्य नाही. कारण त्याच्यामते जर आपण प्रेमात पडलो तर आपले स्वातंत्र्य हिरावून घेतलं जाईल. हा नायक चित्रकार आहे. जेंव्हा अलका ही त्याच्याकडे अभ्यासाला येते, तिही त्याला २० रु. घेऊन वारंवार शरीर सुख देते. पण जसजसा तो अलकाच्या सहवासात येत जातो. तसतसा त्याचा दृष्टिकोन बदलत जातो. शेवटी तो मानतो प्रेम म्हणजे अद्वैत भाव आहे. असे या कादंबरीचे कथानक आहे.

'नागमणी' च्या अनुवादाविषयी माधुरी देसाई लिहितात, ''अनुवादकही तितकाच तरल असायला हवा व ते या संपूर्ण कादंबरीतून व प्रस्तावनेमधून जाणवतं म्हणून तर ही महान साहित्यकृती अशी सहज सुंदर मराठी रुप धारण करुन, त्याचं दिमाखदार मराठी साहित्यात प्रवेश करते आहे.''[४]

**३) इतर लेखन :**

प्रा. टी. के. जाधव यांनी कादंबरी लेखनाबरोबरच 'पूर्तता', 'आई' व 'रिपोर्ट' अशा कथाही लिहिल्या आहेत. तसेच 'द्विशतक महोत्सवी -'गालिब',' 'एक वादळी व्यक्तिमत्त्व- 'अमृता प्रीतम', 'पुल', 'गीत और गझल', 'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा', 'चित्रपट सृष्टीतील एक चमत्कार - 'व्ही. शांताराम', 'तिसरे पंढरपूर' अशा अनेक विषयांवर प्रासंगिक लेखही लिहिलेले आहेत. हे सर्व लेख 'दै. लोकमत', 'केसरी', 'पुण्य-नगरी', 'दै. संचार' इत्यादी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत.

अशा प्रकारची प्रा. जाधव यांची साहित्य संपदा आहे. ASIA/PACIFIC - WHO'S WHO' (Volume Third) या ग्रंथात त्यांची एक साहित्यिक म्हणून नोंद केलेली आढळते. शिवाय 'स्व. ग. दि. माडगूळकर काव्य-स्पर्धा (सांगली)', 'पाब्लो नेरुदा काव्य-स्पर्धा (नागपूर)', 'के. राजू पाटील काव्य-स्पर्धा', 'कै. त्र्यंबक विचारे काव्य-स्पर्धा (मुंबई)' या स्पर्धेत त्यांना प्रथम पारितोषिके मिळाली आहेत. तसेच २००७ चा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' साहित्यरत्न हा पुरस्कार मिळाला आहे. अशा प्रकारे लेखक परिचय व त्यांच्या साहित्याचा परिचय करुन घेतल्यानंतर 'मुखवटा' कादंबरीचा परिचय करुन घेणे आगत्याचे ठरते.

**०३. 'मुखवटा' कादंबरीचा परिचय :-**

लेखकाच्या जीवन-चरित्राचा व वाङ्मयीन कार्याचा आढावा घेतल्यानंतर इथे 'मुखवटा' कादंबरीचा परिचय करुन घ्यावयाचा आहे. त्यासाठी कादंबरीचे कथानक पाहण्याअगोदर कादंबरीच्या आशयाचा विचार करावा लागेल. या कादंबरीचा आशय थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**०३.१ 'मुखवटा' कादंबरीचा आशय :**

'मुखवटा' ही कादंबरी समाजसेविका, प्राध्यापक, आमदार, महापौर अशी अनेक पदे लाभलेल्या एका अविवाहित तरुणीची कहाणी आहे. तिला समाजात मान-सन्मान आहे. प्रतिष्ठा आहे. समाज तिच्याकडे आदराने पाहतो. तिच्याबद्दल समाजमनात आदराची भावना, सहानुभूती आहे. मात्र हे तिचे खरे रुप नसून फसवे रुप असते. ते तिचे ढोंग असते. वास्तविक पाहता ती एक व्यभिचारी, भ्रष्टाचारी स्त्री आहे. पण समाजात वावरत असताना ती समाजसेविकेचा 'मुखवटा' घालून वावरत असते.

ती आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येक पुरुषाशी शाररिक संबंध ठेवते. प्रत्येकाशी प्रेमाचे खोटे नाटक करते. ती त्या व्यक्तीला नादी लावते. आणि ती व्यक्ती पूर्णपणे तिच्या आहारी गेल्यावर ती त्याला दूर लोटते. त्यावेळी त्या व्यक्तीची होणारी तगमग, तडफड पाहून तिला आनंद होत असतो. त्यातून तिला सूख मिळत असते.

पण तिच्या या वागण्यामागे एक वेगळेच कारण दडलेले असते. ती या वागण्यातून समीरचा बदला घेत असते. कारण पुर्वायुष्यात समीरने तिला प्रेमात धोका दिलेला असतो.

म्हणून ती असे वागत असते. पूर्वी तिही सोज्वळ, भावनाप्रधान मुलगी असते. मात्र तिचा प्रेमभंग झाल्यामुळे ती बदल्याच्या भावनेने गैरवर्तन करु लागते. हेच गैरवर्तन कालांतराने तिचे व्यसन बनते. हीच या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे. अशा या स्त्रीचा खरा चेहरा दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने अनेक घटना, प्रसंग, पात्रे यांच्या सहाय्याने केला आहे.

## ०३.२ 'मुखवटा' कादंबरीचे कथानक :

कादंबरीच्या सांगाड्यात कथानक असते. अनेक प्रसंगांच्या मनोहर गुंफणीने कथानक सिद्ध होत असते. कथानकात घटनांची गुंफण व कार्यकारण संबंधाला महत्त्व असते. ''कादंबरीतील कथानक म्हणजे एका किंवा अनेक पात्रांच्या जीवनांतील विवक्षित प्रसंगांची 'चतुराईची गुंफण' होय. लेखक एका प्रसंगातून दुसऱ्या प्रसंगाचे विकसन करीत असतानाच उत्कंठेचे बीजही पेरित असतो.''[१] कथानक हाचा कांदबरीचा गाभा असतो. आपल्या प्रेमभंगाचा बदला एक तरुणी कसा घेते. याच घटनेवर हे कथानक आधारित आहे.

'मुखवटा' कादंबरीची नायिका कु. नलिनी पाटणकर ही आहे. तिच्याकडे पद-प्रतिष्ठा, मान-सन्मान, पैसा सर्व काही आहे. समाज तिच्याकडे आदराने, आपुलकीने पाहतो. आपल्या समस्या, प्रश्न घेऊन लोक तिच्याकडे जातात. तिही आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाशी प्रेमाने, आपुलकीने वागते. प्रत्येकाला आदर देते. दारात येणाऱ्या प्रत्येकाला ती मदत करण्याचे, त्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासनही देते. तिचे रोज वर्तमानपत्रातून फोटोही छापून येतात. एकूणच ती एक आदर्श समाजसेविका, महान स्त्री म्हणून प्रतिष्ठा मिळालेली स्त्री आहे.

या नलिनीचा दिनेश साखळकर हा मित्र आहे. तो अनाथ आहे. शिवाय कवी आहे. 'त्याला साहित्य आणि कलेची जाण आहे.' त्याची आणि नलिनीची ओळख एका कविसंम्मेलनात होते. तसा दिनेश हा नलिनीच्या कॉलेजचा विद्यार्थी. एम. ए. च्या दुसऱ्या वर्षाचे काही पेपर नलिनीकडे शिकवायलाही होते. परंतू त्यावेळेस त्यांची ओळख नसते. एका काव्यसंम्मेलनात दिनेशच्या कवितेला पहिले बक्षीस मिळालेले असते. बक्षीस समारंभाचा हा कार्यक्रम संपल्यानंतर नलिनी आपुलकीने दिनेशची चौकशी करते. त्याला घरी चहासाठी बोलावते आणि इथूनच पुढे त्यांची मैत्री होते.

पुढे-पुढे दिनेश व नलिनीच्या भेटी वाढत जातात आणि त्यांच्यातला संकोच हळूहळू कमी होत जातो. नलिनी आपल्या ओळखीचा वापर करुन दिनेशला प्राध्यापकाची नोकरी

मिळवून देते. त्याचे काव्यसंग्रह प्रकाशित व्हावेत म्हणून प्रकाशकांच्या ओळखी करुन देते. त्याच्याशी अत्यंत आपुलकीने वागते. मातेप्रमाणे त्याची काळजी घेते. त्याची चौकशी करते.

नलिनीच्या अशा वागण्याने दिनेश भारावून जातो. त्याला वाटू लागते आपण अनाथ असल्याची नशिबाकडे उगीचच तक्रार करत होतो. त्याच्या मनात नलिनीबद्दल अपार आदर निर्माण होतो. ''मॅडमशी मैत्री झाली आणि माझी ओंजळ विविध सुखांच्या फुलांनी बहरुन गेली.''[६] असे तो मनाशीच म्हणतो. तो नलिनीलाच माता, पिता, बंधू, मित्र, भगिनी सर्व काही मानू लागतो. तिचे पाय दाबण्यातही त्याला कमीपणा वाटत नाही. या सर्वांतून दिनेशच्या मनातील नलिनीबद्दलच्या भावना, प्रेम, आपुलकी, स्नेह व्यक्त होताना दिसते.

परंतू जसजसा त्यांच्या सहवास वाढत जातो. तसतसे नलिनीचे खरे रुप दिनेशला समजू लागते. त्यामुळे त्याच्या मनातील नलिनीच्या प्रतिमेला तडे जावू लागतात. पहिला तडा त्यावेळी जातो, जेव्हा दिनेश नोकरी मिळाल्याचे पेढे देऊन नलिनीच्या पायावर दर्शन घेण्यासाठी वाकतो त्यावेळेस त्याच्या खांद्याला धरुन उठवताना नलिनी, ''अत्यंत रहस्यमय-गुढ-उत्सुक-कामुक-आर्त स्वरात म्हणते, - 'राजा तुझी जागा माझ्या पायाजवळ नाही, छातीजवळ आहे. माझ्या बाहुपाशात आहे... हो माझ्या बाहुपाशात.''[७] असे म्हणून दिनेशला बिलगते. मग दिनेश आपल्या मनातले तिच्या बद्दलचे विचार, भावना तिला सांगून विरोध करतो. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. नलिनी त्याला आणखीनच जोरात मिठी मारते. आणि मग जे व्हायचे तेच होते.

इथून पुढे मग नलिनीचा एक-एक चेहरा दिनेशच्या समोर येत जातो. स्वत:ला समाजसेविका म्हणवून घेणारी स्त्री कशी समाजाला फसवते, सौ. वासंती कुलकर्णीशी मिळून युनिव्हर्सिटीच्या बहि:शाल कार्यक्रमासाठी मिळालेली रक्कम खोटे खर्च दाखवून स्वत:साठी वापरते, दारुबंदी अध्यक्षा असणारी व 'दारुबंदी' या विषयावर भाषण देणारी नलिनी स्वत:च दारुत आकंट बुडून जाते. दारात आलेल्या भिकाऱ्याला, 'दोन थोबाडात दे त्याच्या. गचांडी मारुन हाकलून दे त्याला' असे नोकराला सांगणारी नलिनी 'भूतदये'चं महत्त्व लोकांना पटवून सांगते.

एवढेच नव्हे तर ५५१ रुपयांऐवजी २५१ रुपये मानधन मिळणाऱ्या ठिकाणी व्याख्यानाला येण्याचं कबूल करुनही ऐनवेळी त्यांना नकार कळवायला सांगते. स्वत:ची

आई सिरियस आजारी असल्याची खोटी तार त्यांना करायला सांगते. या सर्वांतून नलिनीचा नाटकीपणा, ढोंगी वृत्ती, पैशासाठी काहीही करण्याची वृत्ती नजरेस पडते.

नलिनी तिच्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे काम करण्याचे आश्वासन देत असते. पण ते आश्वासन खोटे असते. प्रत्यक्षात ती काहीच करीत नसते. अशा या अश्वासनास मनोहर जोशी नावाचा तरुण बळी पडतो. मनोहर जोशी हा इंग्रजी विषयातून एम. ए. ला 'गोल्ड मेडल' मिळालेला पण बेकार असा तरुण. त्याच्या वडिलांनी घरच्या दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या केलेली असते. मग घरचा सगळा बोजा त्याच्यावर येऊन पडतो.

मनोहर आपणाला नोकरी मिळावी म्हणून बरेच प्रयत्न करतो. नेत्यांच्या घरी पाणी भरणे, भाजी आणणे, मुलं सांभाळणे, कपडे धुणे अशी सर्व कामेही तो करतो. परंतु त्याला नोकरी कोणी देत नाही. मग अखेरचा पर्याय म्हणून तो नलिनीकडे येतो. आपली सर्व परिस्थिती नलिनीला सांगतो. त्यांनतर नलिनी म्हणते, 'अहो, तुम्ही तर माझ्या धाकट्या भावाप्रमाणे आहात. मी तुमच्यासाठी आवश्य प्रयत्न करीन.' असे खोटे आश्वासन देऊन त्याला खोटी स्वप्ने दाखवते. काही दिवसानंतर घरच्या दारिद्र्याला कंटाळून मनोहर आत्महत्या करतो. यातून देशातील बेकारी, गरिबी व नलिनीच्या रुपाने राजकारणी लोकांच्या वृत्तीवर लेखकाने प्रकाश टाकल्याचे जाणवते.

मनोहर प्रमाणेच नलिनी राजापूच्या लोकांनाही फसवते. नलिनी राजापूर येथील सभेत 'तन, मन, धनाने प्रयत्न करणार' असे सांगते. मात्र 'हातमाग योजने'च्या मंजूरीसाठी दिलेले एक लाख रुपये स्वतःच्या चैनीसाठी खर्च करते. राजापूरच्या लोकांनी ती रक्कम परत मागितल्यावर 'ते पैसे तुमच्याच कामात खर्च झाले' असे खोटे सांगते. त्यांना त्यांचे पैसे परत करण्यास साफ नकार देते. यातून तिची भ्रष्टाचारी वृत्ती दिसून येते.

त्याचबरोबर ती आपल्या सानिध्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांशी अनैतिक संबंध ठेवते. वार्ताहराला पैसे देऊन आपल्या बातम्या, फोटो छापायला लावते. अशा अनेक घटना प्रसंगातून दिनेशला तिचे खरे रुप, खरा चेहरा समजू लागतो. त्याच्या समोर नलिनीचे दरवेळी एक नवे रुप, एक नवा चेहरा येत जातो. आणि त्याच्या मनातील तिची प्रतिमा पूर्णपणे भंग पावते. चूरचूर होते.

मात्र नलिनी मुळातच अशी नसते. पूर्वी तिचा स्वभाव असा नसतो. दिनेश जेव्हा तिच्या

या वागण्याचा जाब विचारतो तेव्हा ती म्हणते, ''दिनेश, एक दिवस मी सुद्धा एक सामान्य, सोज्वळ, भित्री, भावनाप्रधान अशी मुलगी होते... माझंसुद्धा एक स्वप्न होतं. एका छोट्याशा घरकुलाचं, एका सुखी संसाराचं...''[८] या तिच्या बोलण्यावरुन तिच्या पूर्व जीवनाची कल्पना येते. मग ती अशी का वागते? तर तिच्या पूर्वजीवनात समीर नावाच्या तरुणाने तिचा प्रेमात विश्वासघात केलेला असतो. म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी ती असे वर्तन करीत असे.

नलिनी व समीरचे एकमेकांवर प्रेम होते. घरातील सर्वांच्या संमतीने त्यांचा विवाहही ठरतो. पण ऐनवेळी समीर नलिनीपेक्षाही सुंदर, श्रीमंत, मोठ्या नोकरीवर असणाऱ्या तरुणीशी विवाहबद्ध होऊन परदेशात निघून जातो. तो नलिनीच्या भावनांचा, मनाचा जराही विचार करत नाही. याचाच बदला घेण्यासाठी नलिनी गैरमार्गाचा अवलंब करते.

समीरने केलेल्या प्रेमभंगाचा सूड उगवण्यासाठी ती मिळेल त्या मार्गाने, मिळेल ते पद, प्रतिष्ठा मिळवू लागली. वाटेल त्याच्याशी संबंध ठेवू लागली. सहवासात येणाऱ्या प्रत्येक पुरुषाशी अनैतिक संबंध ठेवू लागली. प्रेमाच खोट नाटक करुन त्या पुरुषाला वेड लावू लागली. तो तरुण पूर्णपणे तिच्या आहारी गेल्याचा विश्वास पटताच ती त्याला 'एखाद्या वृक्षाची फांदी कलम करावी त्याप्रमाणे स्वतःच्या जीवनातून छाटून टाकू लागली.' त्यावेळी त्या तरुणाची होणारी तगमग, तडफड पाहून तिला आसूरी आनंद होवू लागला. तिचे 'स्त्रीत्व' सुखावू लागले.

पुढे चालून तिला हे जीवन, हे वागणे हवेहवेसे वाटू लागले. त्याची तिला ओढ वाटू लागली. ते तिचे व्यसनच बनले. आता ती या जीवनातून ईच्छा असूनही परत फिरु शकत नाही, '' 'ड्रॅकुला'तील नराधमाला सुंदर-सुंदर स्त्रियांचे रक्त पिण्याची जशी गोडी लागली होती, त्याचप्रमाणे मलाही नवीन-नवीन सुंदर तरुणांवर प्रेम करुन त्यांना दुखविण्याची, त्यांना अर्धमेलं करुन सोडण्याची एक गोडीच लागली. एक व्यसनच जडलं,''[९] असे ती म्हणते. आणि हाच तिचा बदला होता.

अशा प्रकारे इतरही काही घटना, प्रसंग, पात्रांच्या सहाय्याने लेखकाने नलिनीच्या चेहऱ्यावरचे खोटे मुखवटे काढण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीतून लेखकाने शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार, राजयकीय नेत्यांची वृत्ती, देशातील गरिबी, सुशिक्षित बेकारी इत्यादी प्रश्न मांडले आहेत. ''त्याच त्या शहरी प्रणयाभोवती फिरणाऱ्या साहित्याला कंटाळलेल्या

रसिक वाचकांना या कादंबरीनं काही नवं दिलं आहे, यात शंका नाही. प्रत्यही भ्रष्टाचार पाहून, त्याचे चटके सहन करुनही शिक्षण क्षेत्रातील साहित्यिक त्याचं वास्तव चित्रण करण्याचं टाळत आले आहेत. प्रा. जाधवांनी ही कोंडी फोडून वाट मोकळी करुन दिली.''[१०] हा रब्बेसलाम शेख यांचा अभिप्राय काही प्रमाणात खरा वाटतो.

### ०३.३ व्यक्तिचित्रण :

व्यक्तिचित्रण हा कादंबरीचा गाभा असतो. वाचकांच्या मनावर ठसावीत अशी व्यक्तिचित्रणे लेखक वाचकांसमोर मांडत असतो. पात्रांमुळेच कथानकास अर्थ लाभतो. घटनांचे आकर्षणही वाढते. इथे 'मुखवटा' मधील पात्रचित्रणाचे स्वरुप पहावयाचे आहे.

#### १) नलिनी :

नलिनी हे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र आहे. तिच्याकडे लहान-मोठी २७-२८ पदे आहेत. समाज तिच्याकडे आदराने पाहतो. समाजात तिला एक वेगळेच स्थान असते. अनेकजण तिच्याकडे आपले प्रश्न समस्या घेऊन येत असतात. तिच्या दररोज वर्तमानपत्रातून भाषणाच्या, पुस्तक प्रकाशनाच्या, उद्‌घाटनाच्या अशा बातम्या येत असतात. ती प्रसिद्ध समाजसेविका आहे. तिला महान स्त्री, आदर्श समाजसेविका, प्राध्यापिका म्हणून प्रतिष्ठा मिळालेली आहे.

पण हे तिचे खरे रुप नसून फसवे रुप आहे. खरे तर ती समाजाच्या डोळ्यात धूळ फेकून समाजाला फसवत असते. ती व्यसनी, व्यभिचारी आहे. ती भ्रष्टाचारी आहे. ती समाजासमोर आदर्श वागण्याचे नाटक, ढोंग करत असते. जी नलिनी समाजासमोर दारुबंदीवर भाषण देते. दारुपासून होणारे नुकसान सांगते. तिच नलिनी घरी आल्यावर दारुत आकंठ बुडून जाते. विद्यार्थ्यांपासून ते अधिकारी वर्गापर्यंत सर्वांशी शरीर संबंध ठेवणारी नलिनी महिला मंडळात 'पतिव्रता स्त्री' या विषयावर भाषण देते.

वार्ताहरास पैसे देऊन पेपरमधून स्वतःच्या बातम्या छापून आणते. आलकुंठे या विद्यार्थ्यालाही फसवते. आपल्या पदाचा, अधिकाराचा गैर वापर करते. हे तिचे खरे रुप, खरा चेहरा असतो. अशा प्रकारचे वर्तन करुनही ती आपल्या वागणुकीचे समर्थन करताना दिसते.

पण मुळातच ती अशी नसते. तिच्या पुर्वायुष्यात प्रेमभंग झालेला असल्यामुळे ती त्याचा बदला, सूड घेण्यासाठी या मार्गाचा अवलंब करते. आणि ते तिचे एक व्यसनच बनून

जाते. ईच्छा असूनही ती आता यातून माघारी फिरु शकत नाही. त्या जीवनाची तिला आता चटक लागली आहे. अशा या नलिनीच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक बारकावे लेखकाने जिवंतपणे साकार केले आहेत.

**२) दिनेश :**

'मुखवटा' कादंबरीमधील दिनेश ही दुसरी महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. दिनेश हा अनाथ असून एक कवी आहे. तो एम.ए. झालेला आहे. तो स्वभावाने अत्यंत हळवा, भावनिक असा आहे. त्याला इतरांचे दुःख, यातना पहावत नाहीत. इतरांचे अश्रू पाहून त्याच्याही डोळ्यात पाणी येते. अशा या दिनेशच्या मनात सुरुवातीला नलिनीबद्दल अपार आदर असतो. तो नलिनीला आपलं सर्वस्व मानतो. तिच्यासाठी तो काहीही करण्यास तयार असतो.

परंतु काही काळाने नलिनीचे खरे रुप हळूहळू त्याच्यासमोर येवू लागते. तिचा नाटकी, ढोंगी स्वभाव त्याला समजू लागतो. तसतसा त्याच्या मनातील नलिनीबद्दलचा आदर कमी कमी होत जातो. तिचे गैरवर्तन त्याला आवडत नाही. तरीही तो मॅडमच्या सर्व चुका माफ करुन तिला या मार्गावरुन परत वळवण्याचा असफल प्रयत्न करतो. नलिनीही जेव्हा हे वागणे सोडायला तयार नसते तेव्हा तो तिची मैत्री व तिने दिलेली नोकरी दोन्ही सोडून निघून जातो.

दिनेश अनाथ असला तरी इतरांच्या मदतीला धावून जाणारा आहे. जेव्हा मॅडम राजापूरच्या लोकांचे घेतलेले एक लाख रुपये देण्यास नकार देते त्यावेळी दिनेश स्वतःच्या काव्य संग्रहाला मिळालेले एक लाख रुपयांचे बक्षीस राजापूरच्या लोकांना देण्याचे कबूल करतो. नलिनीला भेटण्याची ईच्छा नसतानाही करीम खाँची नोकरी जाईल म्हणून भेटायला जातो. मनोहरची करुण कहाणी ऐकूण त्याचे डोळे पाणावतात. अशा अनेक प्रसंगातून दिनेशच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे.

त्याच्या मनात आदर्श स्त्रीबद्दल आदर आहे. त्याचे स्त्रीबद्दल स्वतंत्र असे विचार आहेत. तो म्हणतो, ''नुसतं 'स्त्री'चं शरीर असल्याने स्त्री, 'स्त्री' होत नाही, मॅडम! इंद्रिये तर जनावरांनाही असतात, इंद्रियाने हाते ती फक्त मादी 'स्त्री' नाही. स्त्री होण्यासाठी 'स्त्री' जवळ पाहिजे असते शालिनता, त्याग, ममता, प्रेम ! तुमच्याजवळ या सर्व गोष्टी आहेत कोठे?''[११] यातून दिनेशचे स्त्रीबद्दलचे विचार प्रकट होताना दिसतात.

येथे लेखकानी दिनेशच्या रुपात माणुसकी जपणारा, हळवा, भावनाप्रधान तरुण उभा केला आहे. अनाथ असूनही मोह नसणारा तरुण इथे भेटतो. याशिवाय काही इतर गौण पात्रे पुढीलप्रमाणे :

**३) पुरुषांची व्यक्तिचित्रणे :**

'मुखवटा' कादंबरीत वरील पात्रांशिवाय इतरही काही पात्रे भेटतात. मुख्य पात्रांना उठावदारपणा यावा म्हणून लेखकानी या गौण पात्रांची निर्मिती केली आहे. त्यापैकी या कादंबरीतील पुरुष पात्रांचा थोडक्यात आढावा इथे घ्यावयाचा आहे.

*** भिकोबा :**

भिकोबा हा नलिनीच्या घरचा वयोवृद्ध नोकर. बंगल्याची देखरेख करणे, बंगल्यावर आल्या-गेल्यांचा पाहुणचार करणे, नलिनीच्या आईची औषधे पोहचविणे अशी कामे हा भिकोबा करतो. तो श्रद्धाळू असून देवावर विश्वास ठेवणारा आहे. दिनेशबद्दल व नलिनीबद्दल त्याच्या मनात आदर आहे. तो प्रामाणिक नोकर वाटतो.

*** कुलकर्णी मास्तर :-**

एक आदर्श शिक्षक कसे असतात याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे राजापूरचे कुलकर्णी मास्तर. 'आदर्श शिक्षक' पुरस्कार विजेते. ते अविवाहित आहेत. त्यांची टिळक, आगरकर, सावरकर, नेहरु, म. गांधी यांच्यावर श्रद्धा आहे. त्यांचा सगळा वेळ शिकवण्यात, ग्रंथवाचनात, समाजकार्यात जातो. त्यांना राजकारणाची उत्तम जाण आहे. राजापूरच्या हितासाठी ते सतत धडपडत असतात. गावात मान-सन्मान असणारे हे पात्र आहे.

*** वकील शेख साहेब :**

एका पायाने अपंग असूनही आपल्या गावासाठी, गावाच्या सुखासाठी धडपडणारे आणखी एक पात्र म्हणजे वकील शेख साहेब होय. यांची वकीली पूर्वी चांगली चालायची. पण त्यांच्यावर एकामागून एक संकटं कोसळतात. सुरुवातीला अपघातात स्वतःचा पाय गमावतो. नंतर काही दिवसातच आजाराने पत्नी व दोन मुले गमावतात. त्यामुळे ते पूर्णपणे उध्वस्त होतात. मग राजापूर या स्वतःच्या गावासाठी जगायचं ठरवतात. ते गावासाठी सतत धडपडत असतात. जातीने मुसलमान असूनही गावात त्यांच्याबद्दल आपुलकीने आदराने बोलले जाते.

*** धांडे पाटील :-**

राजापूरचा कारभार प्रामाणिकपणे करणारे, गावच्या भल्यासाठी काहीही करणारे असे हे धांडे पाटलांचे पात्र दिसून येते. त्यांचे गावावर, गावातील लोकांवर फार-फार प्रेम आहे. ते गावाच्या सुखासाठी काहीही करायला तयार आहेत. ते नलिनीला 'आज आम्ही तुमच्या दारात जीव तरी देणार नाही तर पैसे तरी घेणार', असे बजावतात. यातून त्यांचे गावावरील प्रेम जाणवते.

तसेच त्यांच्या तोंडी येणाऱ्या ग्रामीण बोली भाषेमुळे हे पात्र जिवंतपणे उभे करण्यात लेखकाला यश आले आहे. धांडे पाटलांच्या रुपात एक अस्सल रांगडा, इरसाल सरपंच नजरेसमोर उभा राहतो.

*** मनोहर जोशी :**

कादंबरीत जी पुरुषांची गौण पात्रे भेटतात त्या पात्रांमध्ये मनोहर जोशी या व्यक्तिरेखेचा समावेश करता येईल. हा अतिशय हुशार, बुद्धिमान, सुशिक्षित तरुण आहे. त्याने इंग्रजी विषयातून आपले एम.ए. पूर्ण केलेले असून त्याला विद्यापीठानं 'गोल्ड मेडल' बहाल केललं आहे. मात्र हुशार असूनही त्याला नोकरी मिळविण्यासाठी मोठमोठ्या नेत्यांसमोर हात जोडावे लागतात. तो नोकरी मिळवण्यासाठी अनेकांना भेटतो. नेत्यांच्या घरात पाणी भरणे, भाजीपाला आणणे, कपडे इस्त्री करणे, मुलांना सांभाळणे अशी सर्व कामे करतो. परंतु एवढे करुनही त्याला कोणी नोकरी देत नाही. नोकरीसाठी तो खूप धडपड करताना दिसतो. अनेक ठिकाणी जाऊन आपला अर्ज देतो. पण त्याला नोकरी मिळत नाही.

मनोहरच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब आहे. घरच्या गरिबीला कंटाळून त्याचे वडील आत्महत्या करतात. त्यांच्या मृत्यूनंतर घरातील आईची व भावंडांची जबाबदारी मनोहर घरातील सर्वात मोठा असल्याने त्याच्यावर येऊन पडते. तेव्हा शेवटचा पर्याय म्हणून तो नलिनीला भेटतो. तिला आपली सर्व हकिकत सांगतो. आपल्याला कसलीही नोकरी मिळवून देण्यासाठी विनंती करतो. नलिनी त्याचा बायोडाटा ठेऊन घेते व त्याला नोकरी देण्याचं, त्याच्यासाठी काहीही तरी करण्याचं खोट आश्वासन देऊन पाठवते. पण ती प्रत्यक्षात मात्र काहीच करत नाही. जेव्हा त्याला नोकरी मिळत नाही तेव्हा त्याची आई दुसऱ्यांच्या घरात धुणं-भांडी करण्याचं काम करते. पण त्याने ही त्यांची पोटं भरत नाहीत. तेव्हा घरच्या या परिस्थितीला

कंटाळून वडिलांप्रमाणे मनोहरही आत्महत्या करतो. त्यानं आत्महत्या केल्याचा उल्लेख वर्तमान पत्रातील बातमीतून येतो.

या पात्राच्या माध्यमातून, त्याच्याशी संबंधीत घटना-प्रसंगातून लेखकाने सुशिक्षित बेकारीचा प्रश्न मांडून राजकारणी व्यक्तींच्या कृतीवर, त्यांच्या बेजबाबदार वागण्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुरुष पात्रांबरोबरच इतरही काही गौण पात्रे आढळतात मात्र त्यांचे अस्तित्त्व फारच मर्यादित आहे. उदा. नलिनीचा ड्रायव्हर करीम खाँ, नलिनीचा भाऊ डॉ. युवराज पाटणकर, वार्ताहर अण्णा, अलकुंठे विद्यार्थी इत्यादी पात्रे येतात. तर काही पात्रांचे फक्त नामोल्लेखच येतात. प्रत्यक्षात ते पात्र भेटतच नाही. या पात्रांत दोन थिएटरचा मालक सोनवणे, इन्स्पेक्टर गव्हाणे, इन्स्पेक्टर अभयसिंह काळे, शितोळे व कदम हे विद्यार्थी इत्यादी पात्रांचा समावेश करता येईल. ही पात्रे फक्त संवादातूनच भेटतात.

**४) स्त्रियांची व्यक्तिचित्रणे :**

या 'मुखवटा' कादंबरीत वरील पुरुष पात्रांशिवाय काही स्त्री व्यक्तिरेखाही आढळून येतात. या सर्व व्यक्तिरेखांचा परामर्श थोडक्यात घेणे योग्य ठरेल. या कादंबरीतील बहुतेक स्त्री पात्रे आधुनिक काळातील सुशिक्षित स्वावलंबी असल्याचे निदर्शनास येते.

**• नलिनीची आई :**

'वेड्या आईची वेडी माया' म्हणतात त्याप्रमाणे आपल्या मुलांवर प्रेम करणारी, माया लावणारी, त्यांच्या भेटीसाठी सतत व्याकूळ असणारी अशी ही आई आहे. नलिनीने लग्न करावे, मुलांबाळांचा संसार करावा असे तिला सतत वाटत असते. थोरल्या मुलीने 'लव्ह मॅरेज' केल्याची खंत तिच्या मनात आहे. त्याचबरोबर तिचे आपल्या पतिवरही तेवढेच प्रेम आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या खुर्चीकडे, कोटाकडे बघत ती दिवस घालवते. त्यांच्या निधनाने ती मनातून उदास आहे. ती म्हणते 'भावसायब इतक्या लौकर जायला नकू होतं रं!' अशी ती आपली खंत व्यक्त करतांना दिसते.

**• सुधा तारे :**

दिनेशची विद्यार्थिनी तिचे दिनेशवर पहिल्या नजरेतच प्रेम जडते. ती त्याच्यावर खरं

प्रेम करत असते. दिनेश जर आपला झाला नाही तर जन्मभर अविवाहित राहण्याचा ती निर्णय घेते. ती अतिशय लाजाळू आहे. आपल्या मनातले प्रेम कोणीतरी दिनेशजवळ व्यक्त करावे असे तिला वाटते. तिला दिनेशचा विरहही सुख देतो. असे तिचे दिनेशवर उत्कट प्रेम आहे.

''सुधा तारे!

दिनेश शिकवतो त्याच कॉलेजची एक गोड मुलगी ! दिनेशचीच विद्यार्थिनी. हिरव्यागार पानासारखी टवटवीत. तीर्थजलाप्रमाणे पवित्र वाटणारी. कधीही भडक वेषभूषा न करणारी सुधा तारे ! अत्यंत मोहक वाटायची.''[१२] असे अगदी थोडक्यात लेखकाने तिचे वर्णन केले आहे. तिच्या सात्त्विक प्रेमामुळे ती थोडावेळ येवूनही मनाला चटका लावून जाते.

*** सौ. वासंती कुलकर्णी :-**

नलिनीच्या व्यक्तिमत्त्वाच्या अगदी विरोधी असे पात्र आहे सौ. वासंती कुलकर्णी. ती नलिनीची मैत्रीण व तिच्याच कॉलेजची प्राध्यापिका आहे. तिच्याकडे एक-दोन पदे आहेत. खोटे हिशोब दाखवून, खोट्या पावत्या आणून नलिनी व सौ. वासंती या दोघी युनिव्हर्सिटीच्या बहि:शाल कार्यक्रमाच्या रकमेत भ्रष्टाचार करतात. या पात्रांच्या रुपाने लेखकाने शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचारावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

या स्त्री व्यक्तिरेखांशिवाय विद्या देवधर, उपकुलसचिव आशाताई इंगळे, नलिनीच्या बहिणी मालती व मधुमती इत्यादी स्त्री व्यक्तिरेखा दिसून येतात. अशा प्रकारच्या पात्रांच्या व प्रसंगाच्या सहाय्याने नलिनीच्या चेहऱ्यावरचा 'मुखवटा' दूर करुन तिचे खरे रुप लेखकाने दाखवले आहे.

प्रा. टी. के. जाधव यांच्या या कादंबरीतील बरीच पात्रे ही भावनाप्रधान, हळवी, आदर्शवाद जपणारी, प्रामाणिकपणे वागणारी व माणुसकीला महत्त्व देणारी असल्याचे जाणवते. पण त्याचबरोबर काही ठिकाणी पात्रांची गर्दी झाल्याचे, आवश्यकता नसतांनाही काही पात्रे आल्याचे दिसते. ती पात्रे व त्यासंबंधी घटना, प्रसंग नसते तरी कादंबरीच्या कथानकास किंवा नलिनीच्या व्यक्तिमत्त्वात फारसा फरक पडला नसता असे जाणवते.

**०३.४ निवेदनपद्धती :**

''एका मागून एक या क्रमाने येणाऱ्या कल्पित घटनांच्या अनुक्रमाचे निवेदकाने विशिष्ट

दृष्टीने व विशिष्ट रीतीने केलेले शब्दरुप म्हणजे निवेदन.''[१३] 'मुखवटा' या कादंबरीत प्रा. टी. के. जाधव यांनी तृतीय पुरुषी निवेदन (त्रयस्थ निवेदन) पद्धतीचा अवलंब केला आहे.

या पद्धतीत लेखक सर्व घटकांपासून अलिप्त असतो. तो तटस्थ असतो. त्यास सर्व पात्रे, घटना, प्रसंग माहीत असतात. त्या सर्वांचा तो साक्षी असतो. लेखकाला पात्रांच्या मनातील विचार, कल्पना भावना समजत असतात. काही वेळा तो पात्रांचे अंतर्मनही उलगडून दाखवित असतो. ''अनाथ आश्रमात लहानाचं मोठं झाल्यामुळे एवढ्या आपुलकीच्या नजरेनेही कुणी पाहिलेलेही नव्हते. मी नेहमीच भोगल्या होत्या हाल-अपेष्टा ! जन्मताच कुंतीने फेकूण दिलेल्या कर्णाच्या वेदना !''[१४] यातून दिनेशच्या मनातील अनाथ असल्याचे दुःख व्यक्त होतांना दिसते. 'हाल-अपेष्टा' व 'कर्णाच्या वेदना' या शब्दातून त्याने भोगलेल्या दुःखाची, यातनांची तीव्रता अधिक जाणवते.

त्याचबरोबर काही वेळेस पात्रांच्या बाह्य कृतीविषयी निवेदन आल्याचे निदर्शनास येते. काही ठिकाणी येणाऱ्या निवेदनातून लेखकाचा साक्षीभावही जाणवतो. तसेच आवश्यक तेथे आखीव-रेखीव, परिणामकारक असे शब्द योजून घटना-प्रसंगांना उठावदारपणा प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे निवेदन उत्कट व प्रभावी वाटते. यानंतर प्रा. जाधव यांच्या भाषाशैलीचे स्वरुप पाहणे उचित ठरेल.

### ०३.५ भाषाशैली :

कादंबरीत भाषाशैलीस महत्त्वपूर्ण स्थान असते. ''एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रुपानध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजेच शैली होय.''[१५] प्रत्येक लेखक हा आपली स्वतःची अशी एक वेगळी शैली घेऊनच जन्माला येत असतो. प्रत्येक लेखकाची शैली ही स्वतंत्र असते.

'मुखवटा' कादंबरीत मध्यवर्गीयांच्या रोजच्या जीवनात वापरली जाणारी प्रमाण बोलीभाषा वापरली आहे. तिच भाषा निवेदनासाठीही वापरली आहे. या कादंबरीतील जवळ-जवळ सगळीच पात्रे मध्यमवर्गीय कुटुंबातील असून ती शिक्षणक्षेत्राशी निगडीत आहेत. शिवाय काही पात्रे मोठ-मोठ्या पदावर आहेत. त्यामुळे मध्यमवर्गीयांचीच भाषा योजने योग्य होते. तिच लेखकाने वापरली आहे.

तसेच भाषेची परिणामकारकता वाढावी म्हणून लेखकाने संतवचने, सुभाषिते, श्लोक

इत्यादींचा वापरही केला आहे. तसेच ग्रामीण बोली भाषाही काही पात्रांच्या संवादातून आल्याचे दिसते. विशेषतः भिकोबा व धांडे पाटील ही पात्रे ग्रामीण बोली वापरताना दिसून येतात. उदा. धांडे पाटील म्हणतात, ''आयऽऽला ! ही काय बाई हाय का भूत? दोन वर्षे आम्हांला टोलवत ऱ्हायली आन् आता वर तोंड काढून म्हणतीया, 'पैसं संपलं' म्हणून ! च्या आयला हा काय न्याय झाला व्हय?''[१६] अशा प्रकारची ग्रामीण बोली आढळते. याशिवाय प्रा. टी. के. जाधव यांच्या भाषाशैलीचे इतरही विशेष जाणवतात त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे.

**<u>* काव्यात्मकता :-</u>**

प्रा. जाधव हे मुळातच कवी आहेत. त्यामुळे त्यांच्या कादंबरी लेखनामध्ये काव्यात्मकता अधिक प्रमाणात येताना दिसते. या कादंबरीत एक-दोन ठिकाणी कीटस्‌ची कविता (पृ.२१), कवी जिगर मुरादाबादींच्या काही काव्यपंक्तींचा (पृ. ६४) वापर केला आहे. तसेच काही नवीन कवितांचाही वापर करण्यात आला आहे.

उदा. १) '' मार्ग प्रीतिफुलांनी सजला ।

आज जीवन गवसले मजला ॥

आज जीवन गवसले मजला ॥'' (पृ. २१)

२) ''स्नेही व्यर्थची स्नेह जपती अंतरी

कुणी नेई ना हो, मज प्रियेच्या घरी ..... ॥'' (पृ. ३७,३८)

अशा काव्यपंक्तींबरोबरच 'कविंनी कविता म्हणायला नकार देणं म्हणजे फुलांनी सुगंध द्यायचं अमान्य करण्यासारखं आहे, चंद्रानं चांदणं देण्यात दिरंगाई केल्यासारखं आहे.' (पृ.८१) अशी अनेक लहान-मोठी वाक्ये येऊन काव्यात्मकता निर्माण होते. त्यामुळे प्रसंगाची, घटनांची परिणामकारकता वाढते, भाषेचे सौंदर्य खुलते. अशी काव्यात्मकता अनेक ठिकाणी आली आहे.

*** उपमा आणि प्रतिमा :-**

'मुखवटा' कादंबरीत लेखकाने उपमा व प्रतिमांचा वापर मुक्त हस्ताने केला आहे. ते स्वतः कवी असल्याने उपमा आणि प्रतिमा सहजपणे वापरतात त्यात कृत्रिमता जाणवत नाही. त्याची उदाहरणे पुढीलप्रमाणे -

उदा. १) 'गुळावर तुटून पडणाऱ्या मुंगळ्याप्रमाणे, स्टेजभोवती ..... माणसांची गर्दी वाढत होती.' (पृ. १)

२) 'गोऱ्यापान कपाळावर प्रभातकाळच्या सूर्यबिंबाप्रमाणे ठसठसीत कुंकवाचा टिळा लावलेल्या सुवासिनींनी नलिनीला ओवाळले.' (पृ.२)

३) 'नलिनी जणू दगडमूर्ती बनून ऐकत होती.' (पृ. १९)

४) 'आकाशात एकामागून एक तारका उगवाव्यात तशा मनात आठवणी एकामागून एक येऊन गर्दी करायच्या.' (पृ.२५)

५) 'तात्काळ नलिनीचं दुसरं मन डिवचलेल्या वाघिणीप्रमाणे चित्कारलं' (पृ. ३२)

६) 'पण तिचं संस्कारी मन लाजाळूचं झाड बनून या विचारांचा स्पर्श होताच आकुंचित व्हायचं.' (पृ. ३७)

इत्यादी उपमा आणि प्रतिमांचा वापर केला आहे.

**•हिंदी इंग्रजी शब्दांचा वापर :-**

'मुखवटा' मधील पात्रे सुशिक्षित, शिक्षणक्षेत्राशी संबंधित तसेच चांगल्या पदावर अधिकारी असणारे आहेत. त्यामुळे त्या पात्रांच्या तोंडून हिंदी, इंग्रजी शब्द येताना दिसतात. मात्र हे शब्द दैनंदिन वापरातलेच आहेत. त्यातील हिंदी शब्द पुढीलप्रमाणे :

उदा. खामोश (पृ.३२), लाजवाब, भाभी (पृ.३३), सैतान (पृ. ३९), तुफान (पृ. ६०), मच्छर (पृ. ७३), फैसला (पृ. ११३) इत्यादी तसेच या कादंबरीतील करीम खाँ व शेख साहेब ही पात्रे हिंदी बोली भाषा वापरताना दिसतात.

हिंदी शब्दांबरोबरच इंग्रजी शब्दही आलेले आहेत. उदा. टेबलक्लॉथ (पृ.१), स्मार्ट (पृ.३), ॲडव्होकेट (पृ.१०), काँपिटिशन (पृ.२३), बिझी, बी केअरफुल (पृ.२४), ओ माय गॉड ! (पृ.४४), That's all right (पृ. ४८), बट, डोन्ट टेक इट सिरियसली ! (पृ. ६१), Yes, yes. I will keep my promise definitely. (पृ.६५) I will try my level best... (पृ. ७९) इत्यादी इंग्रजी शब्द व छोटी-छोटी वाक्ये येतात. अशा प्रकारे प्रा. जाधव यांनी नेहमीच्या वापरातले सहज तोंडी रुळलेले शब्द अगदी सहजतेने वापरले आहेत.

या शब्दांमुळे कोठेही अर्थ समजून घेण्यात किंवा अर्थ समजण्यात अडचण येत नाही. त्यामुळे संवाद परिणामकारक वाटतात.

*** शिव्या आणि अश्लीलता :-**

प्रा. टी. के. जाधव यांनी या कादंबरीत पात्रांच्या मनातील द्वेष, राग, मत्सर, चीड, संताप व्यक्त करण्यासाठी शिव्यांचा वापर केला आहे. मात्र त्याचे स्वरुप अत्यंत अल्प आहे. उदा. मेल्यांना ! (पृ.४५), हरामखोर साले !, गाढवांना (पृ.६६), मूर्ख (पृ.७०), नालायक (पृ.९३), च्या आयला (पृ. ११४), आवदसा (पृ. ११५), नीच (पृ.११७), हरामखोर, वांझ साली (पृ. ११८) अशा शिव्या आढळतात.

शिव्यांप्रमाणेच काही प्रसंगी अश्लीलताही दिसून येते. उदा. 'काय करु म्हणजे? आपली आई-बहिण असेल तर कोणाच्यातरी खाली घाल आणि माझे पैसे परत कर.' (पृ.९६), असे नलिनी गोळ्या विकणाऱ्या मुलास सांगते.

तसेच '... अशी प्रसिद्ध बाई जर एकांतात त्यांच्या खाली 'निजत' असेल तर त्यांना काय वाईट आहे.' (पृ.१०५) असा विचार दिनेशच्या मनात येतो. अशा वाक्यातून एका पात्राचे दुसऱ्या पात्राबद्दलचे मतही व्यक्त होते.

*** म्हणी आणि वाक्प्रचार :-**

प्रा. जाधव यांनी प्रसंगानुरुप पात्रांच्या तोंडून योग्य अशा म्हणी-वाक्प्रचारांचा वापर केला आहे. त्यामुळे भाषेची परिणामकारकता वाढण्यास मदत झाली आहे. त्यात कृत्रिमता मात्र जाणवत नाही. त्यातील काही म्हणी पुढीलप्रमाणे :

उदा. काळीज तीळ-तीळ तुटणे (पृ.१९), गाड्याबरोबर नळ्याची जत्रा (पृ.६८), गरजवंताला अक्कल नसते (पृ.३३), भिंतीलाही कान असतात (पृ.७२), मन चिंती ते वैरी न चिंती (पृ.७५), इकडे आड तिकडे विहीर (पृ.७८) इत्यादी मराठी म्हणींबरोबर When heart is full the tongue has to die (पृ.0९) Remember the Devil, and Devil is there (पृ.३९) अशा इंग्रजी म्हणीही वापरल्या आहेत.

कादंबरीतील पात्रांच्या मनातील आनंद, हर्ष, खेद, दुःख, द्वेष इत्यादी भावना प्रकट होण्यासाठी काही वाक्प्रचार आले आहेत. उदा. जीवचा कान करणे (पृ.१३), तळ हाताच्या

फोडाप्रमाणे जपणे (पृ.१५), तारेवरची कसरत (पृ.१८), आनंदाला पारावार नसणे (पृ. ४३), पायाखालची जमीन सरकणे, आश्चर्याचा धक्का बसणे (पृ.६१), सुन्न होणे (पृ.६७), दिवे लावणे (पृ.९७), तळपायाची आग मस्तकाला जाणे (पृ.११६), कान पिकून जाणे (पृ.१५७) इत्यादी वाक्प्रचारांचा वापर करण्यात आला आहे. म्हणी व वाक्प्रचारांच्या वापरामुळे भाषेत जीवंतपणा येऊन भाषा प्रभावी बनते.

**०३.६ कादंबरीतील वर्णने :**

'मुखवटा' कादंबरीत स्थळवर्णने, पात्रवर्णने, प्रसंगवर्णने, एखाद्या पात्राच्या मानसिकतेचे वर्णन इत्यादी वर्णने येताना दिसतात. या कादंबरीची सुरुवातच घोषणांनी व राजापूर येथील सभेच्या वर्णनाने झालेली आहे. त्या सभेचे व तेथील वातावरणाचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतात. ''मंदिराच्या पुढच्या बाजूस एक मोठे भव्य स्टेज उभारले होते. लाल हिरव्या पिवळ्या पताकांनी स्टेजच्या अवतीभोवती चांगलीच शोभा आणली होती... प्रतिष्ठित मंडळींसाठी मोजक्याच खुर्च्या ठेवल्या होत्या... मोठ्या टेबलावर... पाण्याने भरलेला तांब्या, फुलपात्र इत्यादी सर्व सिद्ध होतं.''[१७] अशा प्रकारे लेखक अगदी तपशीलवारपणे वर्णन करतात.

त्याचप्रमाणे काही स्थळांचेही तितक्याच तपशीलाने वर्णन केलेले आहे.

उदा. ''दिवानखान्याच्या दर्शनी भिंतीवरच्या बाजूस... नलिनीचा एक खास पुढारी ढंगातला फोटो आत गेल्याबरोबर,...फोटोच्या खालील चवताळलेल्या आक्राळ विक्राळ, क्रुर वाघिणीचं चित्रंही तेवढंच आकर्षक वाटायचं. दिवानखाण्यात मध्यभागी लालभडक सोफासेट, खुर्च्या, टीपॉय... जमिनीवर हिरव्या रंगाचा गालिचा, एका कोपऱ्यात टेलिफोन.'' अशा प्रकारचे नलिनीच्या दिवानखान्याचे वर्णन करुन लेखक ते स्थळ प्रत्यक्ष नजरेसमोर उभे करण्याचा प्रयत्न करतात.

जरी प्रसंगवर्णने, स्थळवर्णने तपशीलवारपणे येत असली तरी पात्र वर्णने मात्र अत्यंत थोडक्यात येतात. उदा. ''भिकोबा दिसायला एकदम मराठी रंगभूमीवरील नोकराच्या पात्राप्रमाणे ! अंगात कोपरी, गुडघ्यापर्यंत धोतर. खांद्यावर लालसर चौकटी उपरणे, पोक काढून चालण्याची सवय असलेला साठ पासष्ट वर्षांचा वृद्ध''[१८] (पृ.१६) अशा अगदी थोडक्या शब्दांत नलिनीचा नोकर भिकोबांचे वर्णन येते. अशा वर्णनातून लेखक त्या पात्राचे वय, व्यवसाय त्याच्या सवयी

इत्यादी गोष्टीही नमूद करतात. त्यातूनच पात्रवर्णने परिणामकारक वाटतात.

**०३.७ भाष्य :**

निवेदकाच्या योग्य अशा भाष्यामुळे कादंबरीतील अनुभव प्रगल्भ आणि मूल्यमापनयुक्त होत असतो. ''निवेदक कथाकथन करीत असता एखाद्या प्रसंगाचे, पात्राचे, स्थळाचे वर्णन करीत असतो. ते करीत असता तो त्या पात्राविषयी, प्रसंगाविषयी आपले मत, अभिप्राय स्पष्टपणे किंवा अप्रत्यक्षपणे मांडित असतो. त्यांच्या संबंधीच्या ह्या मताला, अभिप्रायाला विचाराला वा चिंतनाला भाष्य (कॉमेंटरी) असे म्हटले जाते.''[१९]

यावरुन असे म्हणता येईल की, एखाद्या घटनाप्रसंगाचा, पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रियांचा, त्यांच्या मानसिकतेचा अर्थ भाष्याद्वारा निवेदक उलगडून, स्पष्ट करुन सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. अशी काही भाष्ये 'मुखवटा' कादंबरीत आलेली आहेत.

''नलिनी व दिनेशमधील सर्वच समाजिक बंधने,... गुरुशिष्य नात्याचा पवित्रपणा... या सर्व गोष्टी शरीराच्या वादळात क्षुद्र कण बनून कुठल्याकुठे उडून गेल्या. आणि उरली ती फक्त एक 'स्त्री' व एक 'पुरुष'. 'नर' - 'मादी', मग स्त्री पुरुष एकत्र आल्यावर युगायुगांपासून जे घडत आलं आहे तेच घडू लागलं.''[२०] या भाष्यातून पात्रांच्या क्रियांद्वारे नैतिक मुल्यांचे अर्थविवरण केले आहे. अशा येणाऱ्या अनेक भाष्यांतून पात्रांच्या मन:स्थितीचा, कृतीचा अर्थ स्पष्ट होण्यास सहाय्य मिळते.

अशा भाष्यातून पात्रांच्या व्यक्तिमत्त्वावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. पात्रांच्या कृती, लकबी, हालचाली भाष्याद्वारे टिपल्या आहेत.

**०३.८ पुनरावृत्ती :**

कादंबरीतील संवाद अधिक परिणामकारक व्हावेत त्यासाठी प्रा. जाधव यांनी काही शब्दांची, वाक्यांची पुनरावृत्ती घडवून आणली आहे. त्याचप्रमाणे काही घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रणे इत्यादींचीही पुनरावृत्ती होतांना दिसते. त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

उदा. १) कादंबरीच्या सुरुवातीलाच येणाऱ्या 'नलिनी पाटणकर झिंदाबाद ! नलिनी पाटणकर झिंदाबाद !! नलिनी पाटणकर झिंदाबाद !!! (पृ.१) याच घोषणा कादंबरीच्या शेवटीही आल्या आहेत. (पृ.१६४) ' I hate you ! I hate you !! I hate you !!! ' (पृ.१५५) हेच वाक्ये

कादंबरीत दुसऱ्या ठिकाणीही (पृ.१५६) आल्याचे दिसून येते.

अशी काही वाक्ये पुन्हा-पुन्हा येतात. तर नलिनीला भेटण्याअगोदर मनोहर१ जे स्वप्न पाहतो (पृ.७५) तेच स्वप्न तो तिला भेटून जातांनाही पाहतो (पृ.८३) तसेच भाऊसाहेबांचे केलेले धांडे पाटलांनी वर्णन (पृ.६) दिनेशाला पुन्हा नलिनीच्या घरी गेल्यावर जसेच्या तसे आठवते (पृ.४७) त्याचबरोबर

१) 'नशामुक्त व्हा !
नशामुक्त व्हा !!
नशामुक्त व्हा !!!'

२) 'आता सकाळ होईल !
आता सकाळ होईल !!
आता सकाळ होईल !!!'

अशा प्रकारचे या पुनरावृत्तीचे स्वरुप आहे. ही पुनरावृत्ती परिणामकारकता वाढवण्यासाठी येत असली तरी काही ठिकाणी ती नको होती असे वाटते. त्यामुळे त्या प्रसंगाची, संवादाची परिणामकारकता वाढल्याचे जराही जाणवत नाही.

**०४. समारोप :-**

अशा रीतीने प्रा. टी. के. जाधव यांनी एका चांगल्या घरातली, सोज्वळ मुलगी आपल्या प्रेमभंगाचा बदला घेण्यासाठी कशाप्रकारे गैरमार्गाचा अवलंब करते, ती कशाप्रकारे समाजाला फसवते आणि हे तिचे वागणे पुढे चालून तिचे व्यसन कसे बनते याचे चित्रण 'मुखवटा' कादंबरीत केले आहे. तसेच भ्रष्टाचार, बेकारी, गरिबी, विशिलेबाजी इत्यादी प्रश्नांनाही त्यांनी या कादंबरीत स्थान दिले आहे.

याच कादंबरीला श्रीनिवास भणगे यांनी 'मॅडम' या नावाने नाट्यरुप देवून ते रंगभूमीवर सादर केले. त्याच नाट्यरुपांतराचा सविस्तर विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहे.

# * संदर्भ ग्रंथ *


०१. मंचरकर, र. बा. : प्रस्तावना - अमृतकण
(लेखक - प्रा. टी. के. जाधव)
शांताई प्रकाशन, पंढरपूर,
आवृत्ती तिसरी, १९७९,
पृष्ठ क्र. ०८.

०२. शेख, रब्बेसलाम : गुलशन-ए-गजल
साप्ताहिक माणूस,
११ ऑगस्ट १९८४, अंक अकरावा,
पृष्ठ क्र. २०.

०३. जाधव, टी. के. : भक्तिगीतकार एक प्राध्यापक !
(मुलाखतकार - वंदना भालचंद्र जोशी)
सामना, शनिवार, दि. १९ एप्रिल २००३,
पृष्ठ क्र. ०३.

०४. देसाई, माधुरी : आस्वाद (फुलोरा)
दै. तरुण भारत,
२४-४-१९८७,
पृष्ठ क्र. ०४.

०५. बापट, प्र. वा.
गोडबोले, ना. वा. : मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)
व्हीनस प्रकाशन, पुणे,
आवृत्ती दुसरी, डिसेंबर १९५७,
पृष्ठ क्र. ८६.

०६. जाधव, टी. के. : मुखवटा
धारा प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली, १९८१,
पृष्ठ क्र. १३.

०७. तत्रैव : पृष्ठ क्र. २८

०८. तत्रैव : पृष्ठ क्र. १४७.

०९. तत्रैव : पृष्ठ क्र. १५०.

१०. शेख, रब्बेसलाम : पुस्तकं
साप्ताहिक दिनांक,
२१ ऑगस्ट १९८२,
१७ वा अंक, पृष्ठ क्र. २८.

११. जाधव, टी. के. : उनि., पृष्ठ क्र. १५२-१५३.

१२. तत्रैव : पृष्ठ क्र. ३७.

१३. पाटील, गंगाधर : कथनमीमांसा
अनुष्टुभ,
सप्टेंबर - डिसेंबर, दिवाळी १९९१,
पृष्ठ क्र. ९७.

१४. जाधव, टी. के. : उनि., पृष्ठ क्र. १४.

१५. नेमाडे, भालचंद्र : वाङ्‌मयीन शैली आणि तंत्र
साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
पृष्ठ क्र. १३९.

१६. जाधव, टी. के. : मुखवटा
धारा प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली, १९८१,
पृष्ठ क्र. ११४.

१७. तत्रैव : पृष्ठ क्र. ०१

१८. तत्रैव : पृष्ठ क्र. १७

१९. पाटील, गंगाधर : उनि., पृष्ठ क्र. १२०.

२०. जाधव, टी. के. : उनि., पृष्ठ क्र. ३०.